पुणे वृत्तान्त लोकसत्ता
शुक्रवार, १३ डिसेंबर २००२


लोकसत्ता पुणे वृत्तान्त
पिंपरी-चिंचवड परिसर

# होमिओपॅथीला लोकप्रिय बनविणारे डॉक्टर

**जे का रंजले गांजले।**
**त्यासी म्हणे जो आपुले।**
**तोचि साधु ओळखावा।**
**देव तेथेची जाणावा।**

या ओळी सार्थ करून दाखविणारे व आपल्या नावाप्रमाणे अमर करता आले नाही तरी दीर्घायुषी करणारे डॉ. अमरसिंह दत्तात्रय निकम. पिंपरीत त्यांचे रुग्णालय अनेक प्रकारच्या व्याधीने ग्रासलेल्या व वेदनेने तळमळणाऱ्या लोकांचे तीर्थस्थान झाले आहे. एवढे भव्य दिव्य काम तिथे चालू आहे. ध्येय, निष्ठा, श्रद्धा, चारित्र्य, बुद्धिमत्ता, संशोधक वृत्ती या गोष्टींच्या बळावर माणूस गगनाला गवसणी घालू शकतो. याचा अनुभव तिथे गेल्यावर आला. व्याधीने तळमळणाऱ्याला वेदनामुक्त करणे हीच ईश्वरसेवा आहे, असे डॉ. मानत असावेत.

सहज एकदा पेशंट म्हणून जाण्याचा योग आला. डॉक्टरांनी अत्यंत आस्थेनी चौकशी केली. त्यांच्या प्रेमळ स्वभावामुळे त्यांच्याविषयीचा आदर दुणावला. सदृढ बांधा, प्रसन्न व्यक्तिमत्त्व, नम्र व शालीन स्वभाव, साधी राहणी, मधुरवाणी फार काही सांगून गेले. रुग्णालयाचे नाव 'आदित्य' नावाप्रमाणेच सूर्यासारखे काम तिथे चालू आहे. 'जाता तरी सुखे जा' हेच या रुग्णालयाचे ब्रीदवाक्य असावे, असे वाटले. या क्षेत्रात डॉ. अमरसिंह निकम यांचे आजोबा विठ्ठल लक्ष्मण निकम यांनी पाया घातला. वडील दत्तात्रय विठ्ठल निकम यांनी भिंती बांधल्या. डॉ. अमरसिंह द. निकम यांनी कळस चढविला. चौथी पिढी याच क्षेत्रात येणार आहे. पिंपरीच्या औद्योगिक नगरीत ५० बेडनी सज्ज असे हे रुग्णालय डौलात उभे आहे. जगातील हे एकमेव रुग्णालय आहे. हे या रुग्णालयाचे वेगळे वैशिष्ट्य आहे. डॉ. जमिनीवर उभे राहून आकाशातील नक्षत्रे मोजतात, असेच चित्र येथे दिसले. होमिओपॅथीच्या औषधाने रोग मुळापासून बरा होतो हे डॉ. निकम यांनी समाजाला सिद्ध करून दाखविले आहे. होमिओपॅथीचे जनक डॉ. सॅम्युअल फेड्रिक हानीमान यांच्या आत्म्याला नक्कीच शांती मिळाली असेल. माझ्या मुलीचे डोके वयाच्या ५ व्या वर्षांपासून दुखत होते. अनेक नामांकित डॉक्टरांची ट्रिटमेंट घेतली. पण गुण आला नाही. त्यांच्या औषधामुळेच तिला बरे वाटले.

आज तिचे वय बावीस आहे. आठवड्यातून दोन दिवस ती झोपूनच राहायची. वेदना तिला सहन व्हायच्या नाहीत. असे १७ वर्षे चालू होते. आज

डॉ. निकम यांचे वडील दत्तात्रय निकम हे होमिओपॅथीचे एक नामांकित डॉक्टर आहेत. सुरुवातीला पिंपरी ग्रामपंचायतीत डॉक्टर म्हणून काम करीत. त्या वेळी दहा पैशाला होमिओपॅथीचे औषध मिळायचे. नंतर काही वर्षांनी त्यांनी पिंपरी गावात स्वतःचा होमिओपॅथीचा दवाखाना सुरू केला. जवळच्या पंचक्रोशीतील लोक त्यांच्याकडे औषध घेण्यासाठी येत असत. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीतही त्यांनी भाग घेतला होता. वडिलांचा वारसा पुढे चालविण्यास या होमिओपॅथीबद्दल काही अनुभव त्यांना आले. एकदा त्यांच्या पायात काटा मोडला होता. त्या वेळी काटा मोडला की, सुईने पोखरून काटा काढणे, बिब्बा घालणे असे उपाय असायचे. तेव्हा त्यांचे वडील दत्तात्रय निकम यांनी त्यांना होमिओपॅथीचे औषध दिले. दुसऱ्या दिवशी काटा आपोआप बाहेर आला. तेव्हा त्यांनी ठरविले की, आपण होमिओपॅथीचेच डॉक्टर व्हायचे. लहान वयात असे बीज रूजले गेले.

डॉ. अमरसिंह निकम यांनी खामगाव, जिल्हा बुलढाणा येथील होमिओपॅथी मेडिकल कॉलेजमधून डी. एच. एम. एल. झाले. नंतर लोकमान्य हॉस्पिटल, चिंचवड येथे ३ वर्षे इन्टर्नरशीप केली. पुढे चिंचोली पिंपळे सौदागर अशा खेड्यात काही दिवस प्रॅक्टिस केली. या अनुभवामुळे होमिओपॅथीचे रुग्णालय काढावे, असे त्यांना वाटू लागले. रोगी निरीक्षणाखाली असेल तर ट्रिटमेंट देणे सोपे जाते. सातत्य व नियमितपणा राहतो. वडिलांचा होमिओपॅथीचा दवाखाना होताच, पुढे त्याच जागेत डॉ. निकम यांनी चार मजली बिल्डिंग बांधली. अनेक अडचणींना तोंड देऊन बांधकाम पूर्ण केले. २ मे १९९५ रोजी आदित्य रुग्णालय असे त्याचे नामकरण झाले. डॉक्टरांचा फोन नं. ७४१२५४९ आहे.


डॉ. अमरसिंह निकम

पहिल्या तीन मजल्यापर्यंत पेशंट असतात. चौथ्या मजल्यावर डॉक्टर स्वतः राहतात. सुरुवातीला रुग्णालयात चारच पेशंट होते. आज ५० बेड्स पेशंटनी भरलेली आहेत. डॉक्टरांचे स्वप्न सत्यात अवतरले.

जगात नामांकित होमिओपॅथी डॉक्टर आहेत, भारतातही होमिओपॅथीचे तज्ज्ञ डॉक्टर आहेत. कलकत्ता, मुंबई येथे होमिओपॅथीचा भरपूर प्रसार झाला आहे. जर्मनी म्हणजे होमिओपॅथीची पंढरी आहे. डॉ. हानीमानचे संग्रहालय तिथे आहे, पण रुग्णालय तेथे नाही.

पॅरिसमध्ये डॉ. हानीमानचे निवासस्थान आहे. ते आजही सुस्थितीत आहे, पण होमिओपॅथीचे रुग्णालय नाही. डॉ. निकम यांचे हे होमिओपॅथीचे एकमेव रुग्णालय आहे. भारतीयांना अभिमान वाटावा असे काम सेवाभावाने डॉ. निकम करीत आहेत.

ही आरोग्याची गंगा केवळ भारतीय रोग्यांनाच नव्हे तर परदेशी गेलेल्या भारतीयांनाही आपल्या कुशीत सामावून घेते व अमृतसिंचन करते. अमृतकुंभच डॉक्टरांना गवसला आहे, असे वाटते. जगातला कुठलाही होमिओपॅथी डॉक्टर भारतात आला की, डॉ. निकम यांच्या

